## संस्थाचालक संघटना बैठकीचे इतिवृत्त दि. १५/११/२०१८

| अ.क. | सर्वसाधारण विषय | कावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
| --- | --- | --- | --- | --- |
| ➢ | **संस्था चालकांच्या सभा व त्यांचे नियोजन** | | | |
| १ | नेमणूका, रोस्टर, सेवाज्येष्ठता यादी हे संस्थेच्या अधिकारातील विषय असताना या संदर्भात जिल्ह्यातील संस्था चालकांच्या सभा का घेतल्या जात नाहीत ? | नेमणूका, रोस्टर, सेवाज्येष्ठता यादी हे संस्थेच्या अधिकारातील विषय असल्यामुळे या संदर्भात शिक्षणाधिकारी यांनी याबाबत होणाऱ्या सुनावणीस संबंधीत शाळांच्या संस्थाचालक यांना देखील सहभागी करुन घ्यावे.<br>यापुढे शिक्षक भरती पवीत्र प्रणाली मार्फत ऑनलाईन होणार असल्यामुळे संस्थेने रिक्त पदे, रोष्टर याची अद्ययावत माहिती पवीत्र प्रणालीवर भरावयाची आहे.<br>शिक्षणाधिकारी यांनी शाळा मुख्याध्यापक यांचेकडून रोष्टर मागासवर्गीय कक्षाकडून लवकरात लवकर तपासून घेण्याची कार्यवाही करावी. आवश्यकता वाटल्यास शाळेतील संबंधीत लिपिकांचे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| २ | शासनाने मार्गदर्शन केल्यानुसार मा. शिक्षण उपसंचालकांच्या सभेपूर्वी मा. शिक्षणाधिकारी यांनी जिल्हा संस्था चालक मंडळाबरोबर सभा आयोजित करावयाची असते. अशा सभा कोणकोणत जिल्ह्यात झालेल्या आहेत व कोणकोणत्या जिल्ह्यात झालेल्या नाहीत याचे निवेदन व्हावे. | सर्व शिक्षणाधिकारी यांनी जिल्हा स्तरवर संघटना सभांचे नियमितपणे आयोजन करावे. शिक्षण उपसंचालक यांचेकडे होणाऱ्या सभापूर्वी जिल्हास्तरावर बैठका अयोजित करुन संघटनेचे प्रश्न आपल्या स्तरावर सोडविण्याचे प्रयत्न करावेत. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ३ | संस्था चालक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांचे ईमेल आय डी नाहीत म्हणून निमंत्रण देता येत नाही, अशी सबब पुढे येते. संस्था चालक हे त्यागी भावनेतून काम करत असतात. संस्था चालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा ईमेल आयडी असतोच असे नाही. तरी प्रत्येक जिल्ह्यात संस्था चालक संघटनांचे पत्ते आम्ही देत आहोत. त्या पत्त्यावर किमान सात दिवस आगाऊ सभेचे निमंत्रण पाठविण्याची जबाबदारी मा. शिक्षणाधिकारी यांचेवर ठेवणेत यावी. | शिक्षण उपसंचालक स्तरावर आयोजित संघटना सभांचे निमंत्रण न मिळाल्याबाबत बऱ्याच संघटनांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. विशेषतः सिंधुदुर्ग जिल्हा.<br>सर्व शिक्षणाधिकारी यांनी शिक्षण उपसंचालक कार्यालयात आयोजित करण्यात येणाऱ्या संघटना सह विचार सभांचे निमंत्रण ४-५ दिवस आधी संघटनांना त्यांच्या पत्त्यावर पाठवाव्यात. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | एम.ई.पी.एस. रुल १९८१ नियम २४ नुसार सादरीकरणासाठी कार्यप्रणाली ठरवून दिलेली आहे. तथापि, नेमणूकांच्या संदर्भात सुनावणीसाठी संस्था चालकांना निमंत्रण नसते. मात्र संबंधीत शिक्षकांना थेट निमंत्रित केले जाते. याबाबतीत स्पष्टीकरणे व्हावे. | शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती प्राधिकारी ही संस्था असल्यामुळे ज्या-ज्या वेळी शिक्षणाधिकारी कार्यालयात सुनावणी आयोजित केली जाईल त्या-त्या वेळी संस्था सचिव/अध्यक्ष यांना सुनावणीस निमंत्रित करावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ➢ | **बी.ए.बी.एड. शिक्षकांच्या सेवा ज्येष्ठतेबाबत समस्या निवारण** | | | |
| १ | डी.एड. पात्रतेवर नेमणूक झालेल्या व बी.ए.बी.एड. पदवी धारण केलेल्या शिक्षकांची सेवा ज्येष्ठता ठरविण्याबाबत गेलेल्या सहा महिन्यात ना.मुंबई उच्च न्यायालयाचे परस्पर विरोधी निर्णय आलेले आहेत. त्यामुळे संभ्रमावस्था निर्माण झालेली असून संस्था चालकांसमोर सेवाज्येष्ठता कशी ठरवावी हा प्रश्न निर्माण झालेला आहे. तसेच मुख्याध्यापक पदेन्नतीमध्ये इ. ५ वी ते १० वी वर्ग असलेल्या विद्यालयामध्ये नव्याने वाद निर्माण झालेले आहेत. मा. शिक्षण संचालक यांनी या संदर्भात अपर मुख्य सचिव यांच्याकडे मार्गदर्शन मागितलेले आहे. या पत्राची प्रत आपल्या कार्यालयाला व शिक्षण विभागांना प्राप्त झालेली आहे का ? त्याचप्रमाणे मुख्याध्यापक पदोन्नतीच्याबाबत आपले धोरण काय आहे? | सद्यस्थितीमध्ये सेवाज्येष्ठतेबाबत शासन निर्णय दि. १४/११/२०१७ नुसार सर्व शिक्षणाधिकारी यांनी कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| २ | कोल्हापूर विभागामध्ये सेवाज्येष्ठते संदर्भात मा. शिक्षण उपसंचालक यांची नेमकी कोणती भूमिका आहे.? | याबाबत शासन परिपत्रक दि. १४/११/२०१७ नुसार कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत. | -- | -- |
| ३ | संस्था चालकांना नियमातील तरतूदीनुसार सेवाज्येष्ठता ठेवण्याचे बंधन आहे. त्यामुळे पूर्वीच्या पध्दतीने म्हणजेच डी.एड. शिक्षकांनी नेमणूक दिनांकापासून १० वर्षाच्या आत बी.ए. पदवी प्राप्त केली असल्यास त्यांना १० व्या वर्षी 'क' प्रवर्गात समाविष्ट करण्याच्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्याचा निर्णय घेतलेला आहे. तरी त्यास मान्यता असावी. | एम.ई.पी.एस.१९८१ अनुसूची'फ'व वेळोवेळीचे शासन निर्णय विचारात घेवून निर्णय घ्यावा. | | |
| ➢ | **मुख्याध्यापक व प्रभारी मुख्याध्यापक नेमणूका** | | | |
| १ | मुख्याध्यापक/प्रभारी मुख्याध्यापक यांच्या नेमणूका (पदोन्नती) करण्याचा अधिकार संस्था चालकांचा आहे. अशा नेमणूका संस्थेकडून झाल्यानंतर व्यथित शिक्षकाने एम.ई.पी.एस. ॲक्ट १९७७ कलम ९ | पदोन्नतीबाबत शिक्षकांच्या काही तक्रारी असल्यास त्याबाबत शिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर सुनावणी न घेता शाळा न्यायाधिकरणकडे अपिल करण्याच्या सूचना | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रमाणे मे. शाळा न्यायाधिकरण कोल्हापूर यांच्याकडे अपिल करावयाचे असते. मे. शाळा न्यायाधिकरणाचे अधिकार शिक्षणाधिकारी यांना नाहीत. असे असताना शिक्षकांच्या तक्रारी घेतल्या जातात. त्यांची सुनावणी घेतली जाते व नाहक मुख्याध्यापक पदाची नेमणूक प्रलंबित ठेवली जाते. तरी अशा तक्रारी करणाऱ्या शिक्षकांना शिक्षण विभागाने, मे. शाळा न्यायाधिकरण यांचेकडे जाण्याच्य सूचना देणे उचित ठरणारे आहे. त्यामुळे संस्थेने मुख्याध्यापक पदाच्या केलेल्या नेमणूका (पदोन्नती) यांना विनाविलंब मान्यता देणेत याव्यात. | संबंधीतांना द्याव्यात. एम.ई.पी.एस. ॲक्ट १९७७ कलम ९ प्रमाणे कार्यवाही करावी. | | |
| २ | प्रभारी मुख्याध्यापकाची नेमणूक ही पदोन्नती नाही. ती प्रशासकीय व्यवस्था आहे. मुख्याध्यापकाच्या नेमणूकीमध्ये केवळ सेवाज्येष्ठता हा निकष नसून गोपनीय अहवाल हे सुध्दा महत्त्वाचे असतात. सेवाज्येष्ठ शिक्षकाचे चौकशीचे काम चालू असल्यास अन्य शिक्षकाचे चौकशीचे काम चालू असल्यास अन्य शिक्षकाकडे प्रभारी मुख्याध्यापकाचे पद देणे उचित असते. यामुळे संस्थेने नेमलेल्या प्रभारी मुख्याध्यापकाच्या नावामध्ये मा. शिक्षणाधिकारी यांनी हस्तक्षेप करणे उचित नाही. तसेच संस्था चालकांनी दिलेल्या प्रभारी मुख्याध्यापकाचा प्रस्ताव बाजूला ठेऊन मा. शिक्षणाधिकारी यांनी स्वतःच प्रभारी मुख्यध्यापकाची नेमणूक करणे उचित ठरत नाही. | प्रभारी मुख्याध्यापक पदास तीन महिन्याऐवजी शैक्षणिक वर्षामध्ये दोन टर्ममध्ये (६-६ महिन्यांसाठी) मान्यता देण्याबाबत शिक्षणधिकारी यांनी कार्यवाही करावी. सदर मान्यता देताना सेवाज्येष्ठतेचा विचार करावा. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ➢ | **रोस्टर संदर्भात** | | | |
| १ | ना. मुंबई उच्च न्यायालयाने याचिका क्र. मध्ये दोन मुख्याध्यापक पदांना आरक्षण लागू नाही. असे स्पष्टीकरण राज्य शासनाला दिले आहे. त्या मुख्याध्यापकाच्या मान्यतेचा प्रश्न मा. शिक्षण सचिवापर्यंत जाऊन त्यास मान्यता पण देण्यात आली. दोन मुख्याध्यापक पदे असलेल्या विद्यालयासाठी रोस्टर कोणत्या पध्दतीने लिहावा? | सदर बाबत शासन निर्णय २७.०९.२०१७ नुसार कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी | -- |
| ➢ | **नेमणूका संदर्भात** | | | |
| १ | बंदी कालावधीत नेमलेल्या शिक्षकांना तात्पुरते शिक्षण सेवक म्हणून मान्यता देण्याबाबत ना.मुबई उच्च न्यायालयाने अनेक नेमणूकांमध्ये शिक्षण विभागाने नामंजूर केलेल्या मान्यता रद्द करुन त्यांच्या नेमणूका ग्राह्य ठरवून दिलेल्या आहेत. याचा अर्थ ना.मुंबई उच्च न्यायालयाच्या | बंदी कालावधीत नियुक्ती केलेल्या शिक्षण सेवकांना मान्यता न देण्याबाबत शासनाच्या सूचना असल्यामुळे मान्यता देता येणार नाही.<br>बंदी कालावधीत नियुक्त शिक्षकांना तात्पुरत्या | -- | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | नागपूर खंडपीठाने पट पडताळणीवरुन शासनाने घातलेली नेमणूकावरील बंदी रद्द केलेली होती हे दृढ होत आहे. काही संस्थानी जाहिरात न देता नेमणूका केलेल्या आहेत. ना. मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण पीठाने कायम रिक्त पदावर योग्य उमेदवार न मिळाल्यास तात्पुरत्या नेमणूका करण्याचे संस्थेला पूर्ण अधिकार आहेत असे स्पष्ट केलेल आहे. अशा परिस्थितीत ज्या संस्था चालकांनी बंदी कालावधीत शिक्षण सेवकांच्या नेमणूकांना तात्पुरत्या स्वरुपात मान्यता देणे शक्य आहे काय? | स्वरुपात मान्यता देण्यासंदर्भात शासनाचे सद्यस्थितीत कोणतेही आदेश नाहीत. | | |
| ➢ | **पवित्र प्रणाली संदर्भात** | | | |
| १ | ना. मुंबई न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्थगिती आदेश दिलेल असताना कोल्हापूर विभागात पवित्र प्रणालीचे कामकाज का चालू ठेवण्यात असलेले आहे ? | संघटनेच्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये या बाबी वरिष्ठांच्या निदर्शनास आणून द्याव्यात. | संघटना स्तरावर | -- |
| २ | शिक्षण संस्थाचालकांनी सेवाज्येष्ठते संदर्भात मार्गदर्शन मागितलेले असताना पवित्र प्रणालीवर माहिती भरणे कसे शक्य आहे? | संघटनेच्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये या बाबी वरिष्ठांच्या निदर्शनास आणून द्याव्यात. | संघटना स्तरावर | -- |
| ➢ | **शिक्षण सेवक मान्यता संदर्भात** | | | |
| १ | कोल्हापूर विभागामध्ये अनेक शाळामध्ये मुख्याध्यापक, शिक्षण सेवक यांच्या नेमणूकांचे प्रस्ताव निर्णयासाठी अनेक वर्षे प्रलंबित आहेत. त्याबाबत निर्णय घेणे. | बंदी कालावधीत नियुक्त शिक्षकांना मान्यता देण्या संदर्भात शासन निर्णय दि.२४.०८.२०१८ नुसार कार्यवाही करणेत यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| २ | शिक्षकेतर कर्मचारी मान्यता-राज्यात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नेमणूकांना बंदी आहे. असे असताना काही शाळांना शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नेमणूकांना मा. शिक्षणाधिकारी यांचेकडून मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे हा निर्णय काही शाळांपुरता मर्यादित का? | शिक्षकेतर कर्मचारी संदर्भात आकृतीबंदाचे काम प्रलंबित असल्यामुळे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मान्यता देता येणार नाही.<br>पणदूर हायस्कूल, पणदूर तिठ्ठा येथे ४ शिपाई पदांना मंजूरी देण्यात आलेली आहे. शिक्षणाधिकारी याप्रकरणी अहवाल सादर करावा व शासनस्तरवरुन आकृतीबंधाचे कामकाज पूर्ण होत नाही तोपर्यंत अशा मान्यता देण्यात येऊ नयेत. | शासन स्तरावर<br>शिक्षणाधिकारी स्तरावर | |
| ३ | ज्या विद्यालयामध्ये शिपाई हे पद नाही त्याबाबतच्या व्यवस्थेबाबत मार्गदर्शन व्हावे. | धोरणात्मक बाब आहे. शिक्षकेतर कर्मचारी संदर्भात आकृतीबंधाचे काम प्रलंबित असल्यामुळे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मान्यता देता येणार नाही. | शासन स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | शिपाई यांच्या कामासाठी रोजंदारी कामगार नेमला तर तो खर्च वेतनेतर अनुदानास पात्र ठरु शकतो का? | धोरणात्मक प्रश्न आहे. | शासन स्तरावर | -- |
| ➢ | **संचमान्यता संदर्भात** | | | |
| १ | प्रतिवर्षी शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर संचमान्यता होते. त्यानंतर अतिरिक्त शिक्षक समायोजन ही प्रक्रिया यामुळे अनेक समस्या व न्यायालयीन प्रकरणे निर्माण होतात. यात सुधारणा कधी होईल? | धोरणात्मक बाब. | शासन स्तरावर | -- |
| २ | दुरुस्त संच मान्यता अद्याप झालेल्या नाहीत. त्या कधी होणार आहेत? निर्माण होणाऱ्या समस्यांना जबाबदार कोण? | संच मान्यता दुरुस्तीबाबत शिक्षणाधिकारी यांनी आपल्या कार्यालयातील संबंधीत विस्तार अधिकारी, उपशिक्षणाधिकारी किंवा प्रोग्रॅमर यांच्या सहाय्याने एनआयसी येथे उपस्थित राहून दुरुस्त्या करुन घेण्याच्या मा. आयुक्त शिक्षण यांच्या सूचना आहेत. | शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) स्तरावर | -- |
| ➢ | **आयत्या वेळचे विषय** | | | |
| १ | नैसर्गिक वाढीने तुकडी मिळणेबाबत | दि. २८/०८/२०१५ च्या शासन निर्णयान्वये तुकडी पध्दत बंद झालेली आहे. त्यामुळे यापूढे नैसर्गिक वाढीने तुकडया, वाढीव तुकड्या मंजूर होणार नाही. | -- | -- |
| २ | त्रैमासिक सभेचे दर तीन महिन्यात आयोजन करण्यात यावे. | शासन परिपत्रक दि. ०३ मार्च २०१८ नुसार शिक्षणाधिकारी यांनी संघटनांच्या सहविचार सभांचे दर तीन महिन्यात नियमित आयोजत करावे.<br>विशेषतः शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. सिंधुदुर्ग यांनी शिक्षण उपसंचालक कार्यालयात आयोजित सह विचार सभांबाबत संघटनेस ४-५ दिवस पूर्वकल्पना द्यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |

शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर